- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

**विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...**
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : गुरूवार, ९ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २१० | किंमत : २ रूपये

**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# एकाचवेळी १० सरकारी अधिकाऱ्यांच्या ठिकाणांवर धाड



**वृत्तसंस्था, बंगळुरू**
कर्नाटकच्या लोकायुक्तांनी बुधवारी राज्यभरात एकाचवेळी धाड टाकत १० सरकारी अधिकाऱ्यांच्या ठिकाणांवर छापेमारी केली. या सर्व अधिकाऱ्यांवर उत्पन्नापेक्षा अधिक मालमत्ता जमा केल्याचा आरोप आहे. बंगळुरू शहर, बंगळुरू दक्षिण, रायचूर, चित्रदुर्ग, तुमकुरु, शिवमोगा आणि कलबुर्गी याठिकाणी अधिकाऱ्यांच्या घरांवर आणि कार्यालयाची झाडाझडती घेण्यात आली. या कारवाईत कृषी विभागातील अधिकारी पुष्पा यांच्या घरातून मोठ्या प्रमाणात सोन्याचे दागिने आणि रोकड जप्त करण्यात आली आहे.
पुष्पा यांच्या घरातून जप्त केलेले सोने आणि रोकड यांचे मोजमाप अद्याप सुरू आहे. संपूर्ण मोजणीनंतर ही रक्कम किती असेल याचे स्पष्टीकरण मिळेल. लोकायुक्तांच्या टीमने ज्या १० अधिकाऱ्यांच्या घरी छापेमारी केली, त्यात कृष्णा भाग्य जल निगमचे एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर बसनगौड पाटील, चित्रदुर्गचे कृषी इंजिनिअर शंकर एम आणि वॉटरशेड डेवलपमेंट विभागाचे अधिकारी दुग्गप्पा यांचा समावेश आहे. त्याशिवाय बंगळुरू सार्वजनिक विभागातील अधिकारी नरेंद्र कुमार, केआरआयडीएल बंगळुरू रेंज ऑफिसमधील सुपरिटेंडेंड इंजिनिअर प्रवीण बी श्री हरी आणि बंगळुरू एपीएमसीचे उपसंचालक पुष्पा डी आर यांच्यावर कारवाई करण्यात आली.
याआधीही कर्नाटकात अशाप्रकारे सरकारी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली होती.
त्या कारवाई वेळी अधिकाऱ्यांच्या ४७ ठिकाणांवर धाड टाकली गेली. त्यात जवळपास ३५ कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आली. या जप्त केलेल्या संपत्तीत जमीन, शेतजमिनीचे कागदपत्रे, घर, रोकड आणि दागिन्यांचा समावेश आहे. १० अधिकाऱ्यांच्या घरातून २२.३१ कोटींचे घर, जमीन आणि शेतजमीन यांचे रेकॉर्ड सापडले. त्याशिवाय ५.९१ कोटींचे दागिने, २.३३ कोटींच्या गाड्या, ३.९६ कोटींचे महागडे सामान, ७८.४० लाखांची रोकड आणि बँक डिपॉझिट जप्त करण्यात आले होते. २५ नोव्हेंबरला ही कारवाई करण्यात आली होती.

### थोडक्यात

## भारतीय हवाई दलाने चीनला पछाडले

**नवी दिल्ली :** इंडियन एअर फोर्सच्या नावावर अजून एका मोठ्या यशाची नोंद झाली आहे. ग्लोबल एअर पावर रँकिंग २०२६ मध्ये इंडियन एअर फोर्सने चीन, जपान आणि पाकिस्तान सारख्या देशांना मागे टाकून टॉप ६ मध्ये स्थान मिळवले आहे. टॉप १० लिस्टमध्ये अमेरिकन फोर्सेजचा दबदबा आहे. वर्ल्ड डायरेक्टरी ऑफ मॉडर्न मिलिट्री एयरक्राफ्टकडून जगभरातील हवाई शक्तीची माहिती दिली जाते तसेच ग्लोबल मिलिट्री एविएशनच्या जमेच्या बाजू आणि कमतरता समोर आणल्या जातात. डब्ल्यूडीएमएमएकडून अनेक आकडे मिळवून रिपोर्ट तयार केला जातो. प्रत्येक एअर फोर्सची किती ताकद आहे, त्या बद्दलची खरी माहिती दिली जाते. डब्ल्यूडीएमएमएकडून सध्या १०३ वेगवेगळ्या देशांच्या १२९ मिलिट्री एअर यूनिट्सच्या एकूण ४८,०८२ एअरक्राफ्टवर लक्ष ठेवले जाते. जटिल फॉर्मुल्याच्या आधारे डब्ल्यूडीएमएमए कडून रँकिंग निश्चित केली जाते. वेगवेगळ्या देशांच्या एअर फोर्सच्या लढाऊ क्षमतेचे आकलन करुन हे रँकिंग बनवले जाते.
त्यानंतर कॅलकुलेशनद्वारे ट्रू-वैल्यू रेटिंग मिळते. ही रेटिंग फक्त एअरक्राफ्टच्या एकूण संख्येच्या आधारावर नाही. टेक्नोलॉजी आधुनिकीकरण, लॉजिस्टिकल सपोर्ट, हल्ला आणि बचाव करण्याची क्षमता या बाबी ध्यानात घेऊन रेटिंग दिले जाते. म्हणजे एखाद्या देशाकडे किती फायटर जेट्सची संख्या आहे, त्यावरुन नाही तर त्यांचा गुणात्मक दर्जा किती आहे, याचे आकलन करुन रेटिंग दिली जाते. या यादीत अमेरिकेच्या एअर फोर्सचा सर्वाधिक स्कोर २४२.९ आहे. ते नंबर १ आहेत. एक्टिव डब्ल्यूडीएमएमए इंडेक्स मध्ये १०३ देश आणि १२९ एअर सर्विस आहेत.

# 'शेतकरी' असेल तरच राज्यात जमीन खरेदी

### भूमाफियांना महसूलमंत्र्यांचा थेट इशारा, धुळ्यातील जमीन घोटाळ्याची 'एसपी'मार्फत उच्चस्तरीय चौकशी, बेकायदेशीर वारस नोंदी आणि व्यवहार होणार रद्द

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**
"राज्यात जमीन खरेदी करायची असेल तर ती व्यक्ती 'शेतकरी' असणे बंधनकारक आहे. यापुढे शेतकरी असल्याचा वैध पुरावा दिल्याशिवाय राज्यात कुणालाही जमीन खरेदी करता येणार नाही, यासाठी संपूर्ण राज्यात जमाबंदी आयुक्तांच्या माध्यमातून जमिनींचे 'मॅपिंग' करून नवीन कडक यंत्रणा उभारली जात आहे," अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली.
धुळ्याचे आमदार अनुप अग्रवाल यांनी धुळे जिल्ह्यातील वडजाई, पिंपरी आणि नरवहाळ येथील जमीन घोटाळ्याचा आणि परराज्यातील व्यक्तींनी नियमबाह्य जमिनी खरेदी केल्याचा प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना महसूलमंत्र्यांनी भूमाफियांचे धाबे दणाणणारे आदेश दिले.

**धुळ्यातील घोटाळ्याची 'एसपी' आणि विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी**

धुळे जिल्ह्यातील तक्रारीची गंभीर दखल घेत महसूलमंत्र्यांनी सांगितले की, "विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र यंत्रणा उभी करून या व्यवहारांची चौकशी केली जाईल. प्राथमिक तपासणीत दोन प्रकरणांमध्ये शेतकरी असल्याचा पुरावा मिळालेला नाही. आमदार अग्रवाल यांनी सादर केलेले तहसीलदारांचे शिक्के असलेले उतारेही बनावट असण्याची शक्यता असल्याने, संपूर्ण प्रकरणाचा तपास धुळे पोलीस अधीक्षकांमार्फत केला जाईल. फसवणूक, बनावट नोंदी आणि सरकारी रेकॉर्डमध्ये फेरफार करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत."

**४४ मूळ प्लॉटधारकांना न्याय मिळणार; २०१० ची चुकीची वारस नोंद रद्द होणार**

धुळ्यातील संबंधित जमिनीच्या इतिहासावर प्रकाश टाकत महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, मूळ मालकांनी ही जमीन विकल्यानंतर ती जयप्रकाश गृहनिर्माण संस्थेच्या ४४ सभासदांच्या नावावर झाली होती. मात्र, २०१० मध्ये मूळ मालकांच्या वारसांनी महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमताने पुन्हा बेकायदेशीरपणे स्वतःची वारस नोंद करून ती जमीन इतरांना विकली. "एकदा जमीन विकली गेल्यावर पुन्हा वारसांची नावे येण्याचा प्रश्नच नव्हता," असे स्पष्ट करत महसूलमंत्र्यांनी घोषणा केली की, शासन या प्रकरणाच्या पुनर्विलोकनासाठी 'एस. एल. आर.' कडे विशेष परवानगी देईल. २०१० ची चुकीची वारस नोंद तात्काळ रद्द करून मूळ ४४ सभासदांचे हक्क कायम केले जातील. तसेच कलम १५५ चा चुकीचा वापर करून क्षेत्रफळात केलेले बदलही रद्द केले जातील.

**मुद्रांक अधिकाऱ्यांना 'थेट ॲक्सेस'; राज्याबाहेरील खरेदीदारांवर करडी नजर**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग आणि मोपा विमानतळाच्या आसपास राज्याबाहेरील लोकांनी मोठ्या प्रमाणात जमिनी घेतल्याचा मुद्दा जयंत पाटील यांनीही उपस्थित केला होता. या पार्श्वभूमीवर महसूलमंत्र्यांनी संपूर्ण राज्यासाठी मोठा निर्णय जाहीर केला.
आता राज्यातील सर्व मुद्रांक अधिकाऱ्यांना जमाबंदी आयुक्तांच्या डेटाबेसचा थेट 'ॲक्सेस' देण्यात आला आहे.



यामुळे कोणतीही व्यक्ती जमीन नोंदणीसाठी आली, तर तिच्या नावावर राज्यात इतरत्र जमीन आहे का आणि तिचा सातबारा कुठे आहे, याची संपूर्ण माहिती मुद्रांक अधिकाऱ्याला जागेवरच उपलब्ध होईल.
राज्याबाहेरील शेतकरी नसलेली व्यक्ती संशयास्पद आढळल्यास तिची नोंदणी तात्काळ रोखून पडताळणी केली जाईल. या नवीन सिस्टीममुळे बोगस शेतकरी बनून जमिनी हडप करणाऱ्यांच्या साखळीला पूर्णपणे लगाम बसेल, असा विश्वास महसूलमंत्री बावनकुळे व्यक्त केला.

# ग्रीसच्या शिपिंग कंपन्यांची चांदी

**वृत्तसंस्था, ॲथेन्स**
रशियावर जी ७ देशांनी तेलासंदर्भात निर्बंध लादल्यानंतरही ग्रीसच्या शिपिंग कंपन्यांनी रशियन कच्च्या तेलाच्या वाहतुकीतून मोठी कमाई केल्याचे समोर आले आहे. फायनान्शिअल टाईम्सच्या अहवालानुसार, जुलै २०२३ पासून आतापर्यंत ग्रीक जहाज मालकांनी रशियन कच्च्या तेलाच्या वाहतुकीतून किमान ३.८ अब्ज डॉलरचा महसूल मिळवला आहे.
अहवालात म्हटले की, ग्रीक मालकीचे टँकर आजही रशियाच्या तथाकथित शॅडो फ्लीट चा मोठा भाग आहेत आणि ते प्रामुख्याने आशियाई बाजारपेठांमध्ये रशियन तेलाची वाहतूक करत आहेत. विशेष म्हणजे, जी ७ देशांनी रशियाचे तेल उत्पन्न कमी करण्यासाठी लागू केलेल्या प्राइस कॅप धोरणानंतरही हा व्यवसाय सुरूच राहिला. दरम्यान, या संपूर्ण कालावधीत रशियन कच्च्या तेलाचा एकही बॅरल प्रत्यक्षात ६० डॉलरपेक्षा कमी दराने विकला गेला नाही. त्यानंतर युरोपियन संघाने युराल्स ब्लेंड तेलासाठी बाजारभावापेक्षा १५ टक्के कमी फ्लोटिंग प्राइस कॅप लागू करण्याचाही प्रयत्न केला. मात्र, त्यामुळेही तेल वाहतूक थांबली नाही, असेही अहवालात सांगितले आहे.

**निर्बंध लागू झाले, पण तेल वाहतूक थांबली नाही**

डिसेंबर २०२२ मध्ये जी ७ देशांनी रशियन कच्च्या तेलासाठी प्रति बॅरल ६० डॉलरची किंमत मर्यादा लागू केली होती. या नियमानुसार, जर रशियन तेलाची किंमत ६० डॉलर प्रति बॅरलपेक्षा जास्त असेल, तर युरोपियन जहाजे, विमा सेवा किंवा आर्थिक सेवा वापरण्यास परवानगी नव्हती. मात्र, अहवालात दावा करण्यात आला आहे की ॲटेस्टेशन फ्रॉड या पद्धतीद्वारे तेलाची खरी किंमत किंवा अतिरिक्त खर्च लपवून या नियमांना बगल देण्यात आली.

# इराणसोबतचा करार रद्द

**वृत्तसंस्था, अंकारा**
तुर्कीची राजधानी अंकारा येथे झालेल्या नाटो शिखर परिषदेदरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणबाबत एक अत्यंत खळबळजनक आणि मोठी घोषणा केली आहे. अमेरिका आणि इराणमधील तणाव कमी करण्यासाठी पाकिस्तानने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांच्या सर्व विनवण्या आणि प्रयत्न पूर्णपणे निष्फळ ठरले आहेत. ट्रम्प यांनी इराणसोबतचा सामंजस्य करार आता कालबा झाला असून तो रद्द केल्याचे जाहीर केले आहे.
नाटो परिषदेत पत्रकारांशी बोलताना डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिका-इराण तणावावर रोखठोक भूमिका मांडली. ते म्हणाले मला वाटते की इराणसोबतचा सामंजस्य करार आता पूर्णपणे संपला आहे.
अलीकडील घडामोडींनंतर दोन्ही देशांमधील या कराराने आपले महत्त्व गमावले आहे. अमेरिका आणि इराणमधील परिस्थिती अशा टप्प्यावर पोहोचली आहे की, या कराराचे भवितव्य आता संपलेले मानले पाहिजे. आपल्या आक्रमक शैलीत ट्रम्प पुढे म्हणाले, आम्ही



काल रात्री इराणमधील अत्यंत धोकादायक व्यक्तींवर एक अतिशय शक्तिशाली हल्ला केला आहे. ही कारवाई अमेरिकेच्या सुरक्षेसाठी अत्यंत आवश्यक होती आणि ही मोहीम पूर्ण ताकदीनिशी राबवण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. इराणी नेतृत्वावर थेट निशाणा साधत ट्रम्प म्हणाले, ते आजारी आहेत, त्यांच्यात काहीतरी नक्कीच गडबड आहे. ट्रम्प यांच्या या विधानामुळे पश्चिम आशियातील लष्करी आणि राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे.

**होर्मुझच्या सामुद्रधुनीतील हल्ल्याचा तीव्र निषेध**

दुसरीकडे, मुस्लिम वर्ल्ड लीगने होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये कतारी आणि सौदी अरेबियाच्या व्यापारी जहाजांना लक्ष्य केल्याच्या कथित घटनेचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. अशा हिंसक घटनांमुळे प्रादेशिक सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला असून हे आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन असल्याचे संघटनेने म्हटले आहे.

**महासचिवांचा इराणवर हल्लाबोल**

मुस्लिम वर्ल्ड लीगचे महासचिव मोहम्मद बिन अब्दुलकरीम अल-इसा यांनी इराणच्या या कथित कारवायांवर तीव्र संताप व्यक्त केला. ते म्हणाले की, इराणचे हे हल्ले म्हणजे धार्मिक मूल्ये, आंतरराष्ट्रीय कायदा, मानवतावादी कायदा आणि जागतिक मानकांचे सरळ-सरळ उल्लंघन आहे. ही गुन्हेगारी कृत्यांची एक मालिकाच सुरू असून, यामुळे पश्चिम आशियामध्ये सुरक्षा आणि शांतता प्रस्थापित करण्याच्या आंतरराष्ट्रीय प्रयत्नांना मोठा खिळ बसत आहे.

**पाकची पुन्हा नाचक्की**

एकीकडे इराणच्या आक्रमक कारवाया आणि दुसरीकडे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाकिस्तानची मध्यस्थी धुडकावून लावत करार रद्द केल्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तानची पुन्हा एकदा नाचक्की झाली आहे.

# वाघाच्या हल्ल्यात गुराखी ठार

### गोबरवाही (हेटी) जंगलातील थरारक घटना



**दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर**
तुमसर तालुक्यातील गोबरवाही (हेटी) शिवारातील सोंदेपूर बिटातील कक्ष क्रमांक ७९ मध्ये ७ जुलै रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास एका पट्टेदार वाघाने मुलाच्या डोळ्यासमोर वडिलांचा जीव घेतल्याची थरारक घटना घडली. बेनीराम राऊत (५८) हे आपला मुलगा विजयसोबत गुरे चारण्यासाठी गेले असताना, झुडपात दबा धरून बसलेल्या वाघाने त्यांच्यावर अचानक हल्ला केला.
विजयने काठीने आणि आरडाओरडा करून प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, परंतु वाघाने बेनीराम यांना फरफटत जवळच्या नाल्यात नेऊन त्यांचा नरडीचा घोट घेतला. या घटनेने परिसरात संतापाची लाट उसळली असून, वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षाबाबत ग्रामस्थांनी वनविभागाच्या कारभारावर तीव्र रोष व्यक्त केला आहे. यापूर्वीही परिसरात जनावरांची शिकार झाली होती, तरीही वनविभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजनांमध्ये दिरंगाई केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.
घटनेची माहिती मिळताच उपवनसंरक्षक योगेंद्र सिंह, प्रकाष्ट निष्कासन अधिकारी रितेश भोंगाडे, वनपरिक्षेत्र अधिकारी छगनलाल रहांगडाले व अन्य अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी तुमसर उपजिल्हा रुग्णालयात पाठवन्यात आले.

**वन विभागाकडून मृताच्या कुटुंबीयांना २५ लाखाची आर्थिक मदत जाहीर**

या घटनेनंतर वनविभागाने मृताच्या कुटुंबियांना २५ लाखांची आर्थिक मदत जाहीर केली असून, त्यापैकी १० लाखांचा धनादेश बुधवारी दिला जाणार आहे, तर उर्वरित १५ लाख रुपये नंतर दिले जाणार आहेत. बेनीराम यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले आणि एक मुलगी असा परिवार असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. वनविभागाने आता केवळ आर्थिक मदतीवर अवलंबून न राहता मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी ठोस प्रतिबंधात्मक धोरण राबवण्याची गरज निर्माण झाली आहे.

# मुस्लीम आरक्षणाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
इस्लाम धर्म स्वीकारणारी व्यक्ती मागासवर्गीय आरक्षणाच्या लाभांसाठी पात्र नाही, असा निकाल मद्रास उच्च न्यायालयाने दिला होता. उच्च न्यायालयाने दिलेल्या या निकालाला आव्हान देत तामिळनाडूचे थलपथी सी जोसेफ विजय यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आहे.
तामिळनाडू सरकारने मागास वर्ग, अति मागास वर्ग, अधिसूचित समुदाय किंवा अनुसूचित जातीमधून इस्लाम धर्म स्वीकारलेल्या लोकांना मागास वर्ग (मुस्लिम) सामील करण्याचा आदेश जारी केला



होता. तत्कालीन एम. के. स्टॅलिन सरकारनेही जात प्रमाणपत्रे देण्यास सुरुवात केली. ज्या मुस्लिम जातींना हे आरक्षण दिले जात होते, त्यांमध्ये अन्सार, दख्खनी मुस्लिम, दुबेकुला, लब्बै, रौथर, माराकायर, मापिला, शेख आणि सय्यद यांचा समावेश होता. मात्र, मद्रास उच्च न्यायालयाने हे असंवैधानिक ठरवले. मद्रास उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती जीआर स्वामीनाथन आणि न्यायमूर्ती पीबी बालाजी यांच्या खंडपीठाने आपल्या निर्णयात म्हटले आहे की, सरकारी आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायिक निर्णयांच्या पूर्णपणे विरोधात आहेत.
या न्यायालयीन निर्णयांनुसार केवळ इस्लाम धर्म स्वीकारणाऱ्या व्यक्तीलाच फक्त मुसलमान मानले जाऊ शकते. इस्लाम धर्म स्वीकारलेल्यांना आरक्षित प्रवर्गाअंतर्गत मिळणारे आरक्षणाचे लाभ रद्द करण्याचा निर्णय मद्रास उच्च न्यायलयाने दिला होता.
दरम्यान, तामिळनाडू सरकारने मद्रास उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री थलपथी विजय यांच्या सरकारने या प्रकरणी ६ जुलै २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केली आहे.